जा.क्र.नांवाशमनपा/नसका/CR-६४/२०१३
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:-२०.०५.२०१४

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**
**सर्वसाधारण सभेची सूचना**
**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण-२ मधील**
**नियम क्र.१ अन्वये**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम १९४९ चे अनुसूचि (ड) चे प्रकरण २ मधील नियम क्र. १ अन्वये प्राप्त अधिकारांनुसार मा. महापौर **श्री अ.सत्तार अ.गफुर** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा दिनांक **२८.०५.२०१४** रोजी दुपारी **३.००** वाजता नांवाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील चवथ्या मजल्यावरील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजित केली आहे.

करीता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**महापौर,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

प्रति,

______________________________

श्री / श्रीमती
सदस्य / सदस्या, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**कार्यक्रम पत्रिका**

**विषय क्र.१:-**

दिनांक २५.११.२०१३ रोजी सकाळी ११.०० वा.व दुपारी २.३० वा, दि.२८.२.२०१४ रोजी झालेल्या मागील सभेच्या इतिवृत्तास कायम करणे बाबत.

**विषय क्र.२:-**

नांदेड वाघाळा महानगरपालिका क्षेत्रातील मुला-मुलींचे गुणोत्तर प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

**लिंग गुणोत्तर -२०१४**

| अ. क्र. | महिना | एकुण जन्म | | एकुण | लिंग गुणोत्तर प्रतिहजार मुलींचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १. | जानेवारी | १५७८ | १४६७ | ३०४५ | ९२९.६५ |
| २. | फेब्रुवारी | १५२२ | १२७९ | २८०१ | ८४०.३४ |
| ३. | मार्च | १६९५ | १५८७ | ३२८२ | ९३६.२८ |
| ४. | एप्रिल | १०९० | ९८१ | २०७१ | ९००.०० |

**विषय क्र.३:-**

***आदेश***

**विषय:-** निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन धारक यांचे माहे १ जुलै २०१३ ते ३० सप्टेंबर २०१३ या कालावधीतील निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनावरील महागाई भत्याची थकबाकी देणे बाबत.

**संदर्भ:-** १. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.निमवा-२०१३/प्र.क्र.७७/सेवा-४दिनांक २८ जानेवारी २०१४
२. कार्यालयीन आदेश क्र.१८९२०/१३ दिनांक ३०.१०.२०१३
३. मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.२६ दिनांक २८.०५.२००२

संदर्भ क्र. चे महाराष्ट्र शासन निर्णय नुसार निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन धारक यांचे दिनांक १ जूर्ल २०१३ ते ३० सप्टेंबर २०१३ या कालावधीतील निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन धारकांना त्यांच्या मुळ निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती आणि महागाई वेतन/महागाई कुटूंब निवृत्ती वेतन (असल्यास) त्यांच्या एकूध रक्कमेवर यापूर्वी ८०% या दराने महागाई भत्ता देण्यात आला असून १ जूलै २०१३ ते ३० सप्टेंबर २०१३ या कालावधी करीता ९०% या दराने महागाई भत्ता वाढ समाविष्ट करण्यात आला आहे.

यावर होणरा खर्च मनपा अंदाजपत्रकातील संबंधीत शिर्षकातून करण्यात यावा.

**विषय क्र.४:-** **अहवाल**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित IDSMT योजने अंतर्गत हिंगोली गेट वरीलDP Site No. A येथे दुकान केंद्राचे बांधकाम करणे (रु. १,०६,२३,३६५) साठी निविदामागविण्यात आले. उक्त कामासाठी एकुण (३) निविदा प्राप्त झाले तुलनात्मक तक्त्यानूसार सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराची निविदा श्री. शिवाजी नामदेवराव इंगळे यांची असून भरलेले दर जास्त वाटत असल्याने कंत्राटदारास वाटाघाटीस पाचारण केले असता कंत्राटदार प्रत्यक्ष उपस्थित राहुन भरलेले दर १७% जास्त ऐवजी ४% जास्त दराने काम करण्याची लेखी संमती दिली.

दर मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्यात आले असता स्थायी समितीने चालू वर्षाच्या डिएसआर नूसार अंदाजपत्रक दरापेक्षा वाढीव निविदा दरानूसार खर्चात किती वाढ होते यासह प्रस्ताव पुढील सभे समोर सादर करण्यात यावा असे नमुद करुन ठराव क्र. १७५ दि. १०.०१.२०१४ पारीत केले. ठरावाच्या अनुषंगाने अंदाजपत्रक दरापेक्षा ४% जास्त दराची निविदा सालसन २०१३-१४ च्या दरसूचीनूसार तुलना केली असता २.४०% जास्त दर येत असल्याने निविदा मंजुरीस्तव व लागणाऱ्या खर्चास प्रशासकीय आर्थीक मंजुरीस्तव फेर प्रस्ताव स्थायी समिती समोर दि. २७.०१.२०१४ रोजी सादर करण्यात आले. दि. ०४.०२.२०१४ रोजी स्थायी समितीची सभा घेण्यात येवुन त्यामधील विषय क्र. २४ वर सदरचा प्रस्ताव घेण्यात आला परंतु सभेच्या निर्णय अद्याप अप्राप्त आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ यामध्ये आणखी सुधारणा करुन महाराष्ट्र शासन राजपत्रात दि. १८ ऑगस्ट २०११ मध्ये प्रसिध्द करुन सुधारणा करुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ७३ मध्ये अनुसुचि `ड` च्या प्रकरण २ मध्ये, नियम ३ मधील खंड (क) काहीही अंतर्भुत असले तरी, जेथे कोणत्याही संविदेसाठी आयुक्ताकडुन स्थायी समितीची मान्यता घेतली जाते. अशा बाबतीत. स्थायी समिती, त्यासंदर्भात आयुक्ताने केलेल्या प्रस्तावावर, तो प्रस्ताव समितीस मिळाल्यानंतरच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासुन पंधरा दिवसाच्या आत असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील. मग अशा प्रस्तावाशी निगडीत बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेण्यात आलेली असो किंवा नसो-तसे न केल्यास, अशा संविदेस स्थायी समितीने मान्यता दिलेली असल्याचे मानण्यात येईल, आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्ताकडुन महानगरपालिकेला पाठवावा अशी तरतुद आहे. प्रशासकीय प्रस्ताव कार्यालयीन पत्र क्र. साबांवि/२७६५३/१४ दि. २७.०१.२०१४ अन्वये मान्यतेस्तव स्थायी समिती समोर सादर केला होता त्यानंतर दि. ०४.०२.२०१४ रोजी लगतची सभा घेण्यात आली परंतु निर्णय अद्याप अप्राप्त आहे. सभेच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत प्रस्ताव विचारात घेतलेला नाही त्यामुळे स्थायी समितीची मान्यता मिळाली असे गृहित धरून IDSMT योजने अंतर्गत हिंगोली रोड वरील DP Site No. A-५ येथे दुकान केंद्राचे बांधकाम करणेसाठी कार्यालयीन आदेश क्र./साबावि/२३७१/२०१४दि.९/५/२०१४ अन्वये श्री. शिवाजी नामदेवराव इंगळे यांची ४% जास्त दराची निविदा मंजुर करण्यात आली करिता माहितीस्तव.

**विषय क्र.५:-**

नांवामनपा हध्दीतील हैदरबाग पाण्याच्या टाकीजवळ रस्ता क्र.९ लगतच्या भागात व्यापारी संकूल बांधणेसाठी उपलब्ध्द असलेली जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असून त्याचे भाडे दिले जाते .पाण्याची टाकी व रुग्णालय असे पर्यत भाडे देय असणार आहे. या ठिकाणी रस्ता लगत गाळयाचे बांधकाम केल्यास त्याचा वापर मजबुत संरक्षक भिंतीसारखा होइल त्या शिवाय बांधकामाचा खर्च लिलावातून अनामत रक्कमेव्दारे प्राप्त होईल. व दरमहा भाडे मिळेल. त्यामूळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल गरीब वस्ती मध्ये महानगरपालिका सवलतीच्या दराने पाणी पुरवठा करते. त्यात महानगरपलिकेस तोटा सहन करावा लागतो. पाणी पुरवठा विभागास मदत होणार आहे. त्यामूळे नांवामनपा हदीतील हैदरबाग पाण्याच्या टाकीजवळ रस्ता क्र.९ लगतच्या भागात व्यापारी संकुल बांधणेसाठी प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्र.६:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने सर्व साधारण सभा ठराव क्र. ५५ दि. ३० एप्रिल २०१३ अन्वये नांदेड शहराच्या मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये सेक्टर डी, मधील स. नं. ११९ मध्ये ईपी ११ (६) नुसार मध्यवर्ती इमारत (महसुल), सार्वजनिक निमसार्वजनिक वापरासाठी दर्शवलेले आहेत. त्यापैकी १.६ हेक्टर जागा नकाशात दर्शविल्याप्रमाणे नविन आ. क्र. डी- ३७ मुस्लीम कब्रस्तानसाठी आरक्षित करुन त्याचे समुचित प्राधिकरण नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका करणेसाठी मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये किरकोळ फेरबदल करण्याची शिफारस करण्यात आली आहे. सदरील किरकोळ फेरबदलाच्या प्रस्तावा संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) मधील तरतुदीनूसार त्या संबंधीची प्ररुप अधिसुचना मराठी व इंग्रजी भाषेत सायं दै. नांदेड वार्ता मध्ये दि. ०५.०९.२०१३ व दै. नांदेड आलमी तहेरीक मध्ये दि. ०५.०९.२०१३ मध्ये मराठी व उर्दू भाषेत तसेच महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि. १९.०९.२०१३ रोजी पृष्ठ क्र. ४३, ४४ व ४५ वर प्रसिध्द झालेली आहे. महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून विहित मुदतीत दि. २७.०९.२०१३ रोजी कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापिठ, कृषि नगर, परभणी यांनी प्रस्तावाच्या अनुषंगाने आक्षेप अर्ज दाखल केलेला आहे. तरी उक्त फेरबदलास मान्यता देण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर

रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्ताव शासनास सादर करणेच्या मंजूरीसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड च्या सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव ठेवण्यात यावा.

**विषय क्र.७:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कंत्राटी पध्दतीने एकत्रित वेतनावरील खालील कंत्राटी पध्दतीने एकत्रित वेतनावर महिला वैद्यकिय अधिकारी-२ व सिनियर डॉटस प्लस सुपरवायझर-१ हे पदे भरण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६८ दि.८.८.२०११ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. संबंधित कर्मचाऱ्यांचे कामाची आवश्ययकता असल्याचे व काम समाधानकारक असल्याचे प्र.वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचे पत्र क्र.२२८/१३ दि.३.१.१४ अन्वये अहवाल प्राप्त झालेला असून सौ.कोटलवार श्रुती रविंद्र, सौ.राठोड विजया परशुराम कंत्राटी वैद्यकिय अधिकारी महिला व श्री सोळंके राम मारोतराव एकत्रित वेतन रु.१५०००/- कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस TB/HIV सुपरवायझर यांना दि.३१.१२.२०१३ चा तांत्रिक खंड देवून दि.१.१.२०१४ पासून पुर्वीच्याच अटी व शर्तीच्या अधिन राहून यापुढे दर सहा महिण्याला एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून मुदतवाढ देणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.८:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कंत्राटी पध्दतीने एकत्रित वेतनावरील एकुण १० वैद्यकिय अधिकारी/सहायक वैद्यकिय अधिकारी कार्यरत असून सदरील वैद्यकिय अधिका-यांची महानगरपालिकेस आवश्यकता व संबंधिताचे काम समाधानकारक असल्याचे प्र.वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी अहवाल दिलेला असल्यामूळे सदरील कंत्राटी वैद्यकिय अधिकारी-८ एकत्रित वेतन रुपये १५०००/-व सहायक वैद्यकिय अधिकारी -२ एकत्रित वेतन रु.१००००/- अधिक प्रोत्साहन भत्ता रु.२०००/- असे एकूण रु.१२०००/-दरमहा एकत्रित वेतन देण्यात येते. तथापी सर्व संबंधितानी त्यांना देण्यात येत असलेले एकत्रित वेतन हे कमी असल्यामूळे त्यांनी मा.आयुक्तांना विनंती केली असता आरोग्य विभागाची मा.आयुक्त यांचे कक्षात आढावा बैठक घेण्यात आली प्र.वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी सदरील कंत्राटी वैद्यकिय अधिकारी/सहायक वैद्यकिय अधिकारी हे समान काम करीत असल्यामूळे संबंधिताचे वेतनात तफावत असून ते कमी असल्यामूळे यापूढे सर्वास दरमहा एकत्रित वेतन रुपये २५,०००/-दरमहा देणे योग्य आहे.

करीता वरील कंत्राटी वैद्यकिय अधिकारी-८ व सहायक वैद्यकिय अधिकारी-२ यांच्या एकत्रित वेतनात वाढ करुन दरमहा एकत्रित वेतन रु.२५०००/- देण्यासाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.९:-**

नादेड वाघाळा शहर महानगरपालिके अंतर्गत राबविण्यात येणा-या केंद्र शासन-राज्य शासन अर्थसहाय्यीत **राजीव आवास योजनेचा (RAY)** तांत्रीक कक्ष स्थापन करण्यासाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत कंत्राटी पध्दतीने / एकत्रीत वेतनावर खालील पदे भरणे आवश्यक आहे. या कक्षासाठी तज्ञ अधिकारी यांचा वेतनावर होणारा खर्च केंद्र व राज्य शासना मार्फत प्राप्त होणा-या निधीतुन करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| 1 | MIS Specialist | 01 | **1)** BE/ B.Tech. Computer Science/Electronics, BCA/ PGDCA in IT, B.Sc. Computer Science.<br>**2)** Minimum of three years in government/semi govt/ autonomous organizations/private company of repute. Should have exposure to software development & project management, database management, MIS etc,<br>**3)** Ability to work in a team and train staff on the job to use the systems and assist in day to day issues related to IT.<br>**4)** Fluency in English and local language essential |
| 2 | GIS Specialist | 01 | **1)** Bachelor degree in Planning, Engineering/ Geography/ Computer Sciences or Other relevant discipline with 3 years of work experience.<br>**2)** Demonstrated proficiency and creative application of GIS in the urban context<br>**3)** Knowledge of urban planning & housing.<br>**4)** Ability to work with, motivate/ train Govt. staff |
| 3 | Town Planning Specialist | 01 | **1)** Bachelor Degree in Planning with specialization in Urban Planning<br>**2)** Minimum of three years work experience in urban planning with experience of urban infrastructure projects.<br>**3)** Experience of reform oriented projects is desirable.<br>**4)** Fluency in English and local language essential |
| 4 | Project Engineering Specialist | 01 | **1)** Bachelor degree in Engineering with specialization in public health engineering<br>**2)** Minimum of three years experience in procurement, design, and supervision of infrastructure works, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **3)** Ability to assist ULBs to set standards and procedures for ensuring quality and monitoring compliance,<br>**4)** Prior experience as municipal engineer will be an added advantage,<br>**5)** Fluency in English and local language essential |
| 5 | Capacity Building / Training co-ordinator | 01 | **1)** Bachelor or doctoral degree in Urban Planning and management, Social Sciences, with practical experience of working in the development areas, preferably in urban development<br>**2)** Minimum of three years experience in urban sector<br>**3)** Wide knowledge and experience in implementing governance reforms<br>**4)** Training in organizational behavior and management of institutional change processes<br>**5)** Experience in designing capacity building activities, preferably in the municipal environment. |

वरील सर्व पदांसाठी एकत्रीत वेतन पुढील प्रमाणे निश्चीत केले असुन त्यानुसार पदव्युत्तर पदवी धारकासाठी रुपये 50,000/-, पदवीधारकासाठी एकत्रीत वेतन रुपये 35,000/- व पदविकाधारक उमेदवारासाठी रु. 25,000/- प्रतिमहा एकत्रीत वेतन या प्रमाणे सदरची कंत्राटी पदे भरुन **राजीव आवास योजनेचा (RAY)** तांत्रीक कक्ष स्थापन करण्यासाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार कार्यवाही करण्यासाठी चा प्रस्ताव येत्या सर्व साधारण सभेसमोर मान्यतेस्तव ठेवण्यात यावा.

**विषय क्र.१०:-**

शासन परिपत्रक क्र.ठामपा 2002/821/प्र.क.86/नवि-23, दिनांक 02 जुलै 2008 अन्वये महानगरपालिका कर्मचारी / अधिकारी यांचे मॉडेल सेवा प्रवेश नियम तयार करण्याचे निर्देश आहेत. त्याअनुषंगाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचारी / अधिकारी मॉडेल सेवा प्रवेश नियम शासनाने तयार केले असुन यापूर्वीचे सर्व सेवा नियम अधिक्रमीत करुन त्या आधारे प्रत्येक महानगरपालिकेने नव्याने त्यांचे स्वत:चे सेवा प्रवेश नियम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 च्या कलम 457 (3) अन्वये तयार करण्यासंबंधात निर्देशीत केलेले आहे. त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रारुप सेवा प्रवेश यापूर्वी तयार करण्यात आलेले असुन त्यास मनपा सर्व साधारण सभेने दि.08.08.2011 रोजी ठराव क्र.94 अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे.

तथापि, दि.06.02.2014 रोजी आस्थापनेवरील रिक्त असलेल्या पदांवर पदोन्नती देणेसाठी निवड समितीची बैठक आयोजित करण्यता आली असता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनवेर वर्ग-4 संवर्गातील शैक्षणिक अर्हताधारक व चांगल्या प्रकारे काम करणा-या सध्या कर्मचा-यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्याचा लाभ मनपा प्रशासनास व्हावा तसेच त्यांना पदोन्नतीच्या संधी भविष्यात उपलब्ध होण्यासाठी सेवा प्रवश नियमात सध्या लिपीक पदासाठी पदोन्नतीसाठी प्रस्तावित असलेल्या 25% पदोन्नतीमधुन 12.5% पदे सेवाजेष्ठतेने व 12.5% पदे लिपीक पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता पूर्णपणे धारण करणा-या कर्मा-यांची अंतर्गत विभागीय परीक्षा **Inter departmental competitive exam** घेऊन पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यासाठी सेवा प्रवेश नियमामध्ये अंशतः सुधारणा करण्यासाठी मनपा सर्व साधारण सभेची मान्यता घेण्याची शिफारस निवड समितीने केलेली आहे.

उक्त बाब विचारात घेता मनपा प्रारुप सेवा प्रवेश नियमात खालील दर्शविल्याप्रमाणे अशंत: दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी 1.नामनिदेर्शन 2.पदोन्नती 3.प्रतिनियुक्ती | कमाल वयोम र्यादा | शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पध्दत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रेणी-3 प्रशास कीय सेवा | लिपीक/ टंकलेखक/ नोंदणी लिपीक/मार्ग लिपीक/बिल कलेक्टर/संगणक चालक/ज्यु.ऑडीटर / रोखपाल | नामनिर्देशन 75% | 33 वर्ष | १. एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण<br>२. राज्य शासनाची मराठी टंकलेखन 30 शप्रमी (जीसीसी) आणि इंग्रजी टंकलेखन 40 शप्रमी परीक्षा उत्तीर्ण.<br>३. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक स्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>४. मराठी लिहीता, वाचना व बोलता येणे आवश्यक. |
| | | | **पदोन्नती 25% पैकी** | | |
| | | | **पदोन्नती** | -- | १. महानगरपालिका आस्थापनेवरील किमान एसएससी परीक्षा उत्तीर्ण व |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 12.5%<br>**सेवाजेष्ठतेनुसार** | | चतुर्थश्रेणी संवर्गातुन किमान 5 वर्षाचा अनुभव असणा-या कर्मचा-यांमधुन.<br>२. मराठी 30 शप्रमी व इंग्रजी टंकलेखनातील 40 शप्रमी चे प्रमाणपत्र व एमएससीआयटी परीक्षा पदोन्नती पासुन 6 महिण्याच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक. |
| | | | **पदोन्नती 12.5% अंतर्गत विभागीय परीक्षेद्वारे Inter departmental competitive exam** | -- | 1. महानगरपालिका आस्थापनेवरील एसएससी परीक्षा उत्तीर्ण.<br>2. चतुर्थश्रेणी संवर्गातील किमान 5 वर्षाची अर्हतकारी सेवा.<br>3. मराठी 30 शप्रमी व इंग्रजी टंकलेखनातील 40 शप्रमी चे प्रमाणपत्र व एमएससीआयटी संगणक हाताळणी प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>4. उक्त नमुद शैक्षणिक अर्हता धारण करणा-या कर्मचा-यांची एकुण 100 गुणांची परीक्षा ज्यामध्ये 50 गुणांची लेखी, 30 गुणांची संगणकीय टंकलेखनाचे प्रात्याक्षिक व 20 गुणांची मुलाखत घेण्यात येईल.<br>5. तसेच लेखी व संगणकीय टंकलेखनाचे प्रात्याक्षिक अशा दोन्ही परीक्षेचे मिळुन किमान 45% गुण घेणे आवश्यक आणि 45% गुण घेणारे कर्मचारीच मुलाखतीसाठी पात्र ठरतील.<br>6. परीक्षेच्या गुणपध्दतीमध्ये कर्मचा-याच्या सेवाजेष्ठतेनुसार त्यांस गुण देण्यात येईल 05 वर्षाच्या अर्हतकारी सेवेनंतर प्रत्येक वर्षासाठी कर्मचा-यांस 0.1 याप्रमाणे गुण देण्यात येतील व सदरचे गुण मुलाखतीच्या गुणात गणण्यात येतील.<br>7. लेखी परीक्षा स्थानिक माहिती व मनपातील वापरले जाणारे वेगवेगळे कायदे, सामान्य ज्ञान, बुध्दीमापन चाचणी, तांत्रिक प्रश्न, बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न व कार्यालयीन प्रक्रिया इत्यादीवर घेण्यात येईल. |

उक्त दर्शाविल्याप्रमाणे प्रस्ताव येत्या मनपा सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव ठेवण्यात यावा.

**-: स. सदस्यांचे प्रस्ताव :-**

**विषय क्र.११:-** **प्रस्ताव**

१. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित लागू असलेली LBT कर रद्द करून पर्यायी व्यवस्था करून होणारे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसानाची भरपाई म्हणून तेवढे शासन अनुदान अथवा मनपा कर्मचाऱ्यांचे पुर्ण वेतन अनुदानरूपी दरमहा देण्याबाबत शासनास शिफारस करणेबाबत.

२. राजस्थानी समाज रितीरिवाजाप्रमाणे अंतिम संस्कार करण्यासाठी ५००० चौ.फुट जागा उपलब्ध करून देणेबाबत.

३. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित लागू असलेले हार्डशिप प्रिमियम चे विशष मोहीम अंतर्गत प्रस्ताव घेऊन दर कमी करून मनपाचे उत्पन्न वाढविणे बाबत.

४. मगनपुरा येथील मंजूर अभिन्यासामधील मोकळया जागेतील अतिक्रम काढून उद्यान विकसित करणे बाबत.

**सुचक-** नवल पोकर्णा **अनुमोदक-** विरेंद्रसिंघ गाडीवाले.

**विषय क्र.१२:-** **प्रस्ताव**

जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत मलवाहिणी चे काम कंत्राटदार केसीपी यांनी निविदाच्या अर्टी व शर्तीचे उल्लंघन करुन कामे इतर कंत्राटदारांना वाटप केली असून सदरील कंत्राटदारा विरुध्द चौकशी करुन कंत्राट रद्द करुन नांव काळया यादीत टाकून सबलेट केलेल्या रक्कमेची वसुल करण्यासाठी व या प्रकरणी केंद्र व महाराष्ट्र शासनास कळविणे बाबत चर्चा करणे.

**सुचक-** आनंद चव्हाण **अनुमोदक-** शफि अहेमद कुरेशी

**विषय क्र.१३:-** **प्रस्ताव**

नांदेड प्रिमियम लिग क्रिकेट स्पर्धासाठी ग्राऊंड उपलब्ध्द करुन देणे बाबत.

**सुचक-** आनंद चव्हाण **अनुमोदक-** नवलकुमार पोकर्णा

**विषय क्र.१४:-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर माहनगरपालिकातर्फे इतर महानगरपालिकां प्रमाणे महापौर यांचेसाठी निवासस्थान करणे बाबत.

**सुचक-** अ. लतीफ अ. माजीद **अनुमोदक-** इशरत फातेमा अ. शमीम , विश्वास बालाजीराव कदम

**विषय क्र.१५:-** **प्रस्ताव**

देगलूर नाका भागात बाहेर गावाहून येणाऱ्या जड वाहनांच्या प्रवेशामुळे वाहतूक कोंडी हाऊन नागरीकांना, शळकरी मुलांना, रूग्णांना फार त्रास होत आहे. सदर भागात दोन-दोन तास वाहतुक ठप्प होत आहे व अनेक अपघात होत आहे. तरी बाहेर गावाहून जुन्या पुलावरून येणाऱ्या व रेल्वे स्टेशन माळटेकडी गोडाऊन ते वाजेगांव पर्यंत ये-जा करणाऱ्या जड वाहनास शहरात सकाळी ९ ते सांकाळी ९ वाजेपर्यंत बंदी घालण्यास व आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक-** सय्यद शेर अली महेबुब अली **अनुमोदक-** हसन बिन उबेद अलकसेरी, अंजुम बेगम शेख अफरोज

**विषय क्र.१६:-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील प्रभाग क्र.३ मधील आदर्शनगर भागात आरसीसी नाली बांधकामाकरीता मराठवाडा पॅकेज अंतर्गत शिल्लक असलेल्या निधीतून रु.४.००लक्षाची तरतूद करण्याची प्रशसकीय व आर्थिक मान्यता हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक -** उमेश पवळे **अनुमोदक-** श्रीनिवास सातेलीकर

**विषय क्र.१७:-** **प्रस्ताव**

ज्ञानेश्वर नगर -प्रभाग क्र.८ मधील ज्ञानेश्वरनगर येथील श्री पाठक यांच्या गल्ली पासून श्री एकनाथ बोखारे यांच्या घराजवळ आलेली पाणी पुरवठयाची पाईप लाईन बंद करावी तर श्री शामरावजी कदम यांचे घरापासून पाईप लाईन टाकून श्री रामराव लोखंडे यांच्या घरापर्यंत जोडून पुन्हा श्री एकनाथ बोखारे यांचे घराजवळील पाईप लाईनला जोडावी जेणे करुन त्या भागात पाणी पुरवठा सुरळीत होईल.या भागातील सर्व नागरीक महानगरपालिकेचा टॅक्स रेग्युलर भरणारे आहेत.

१. भंडारी नगर- जोगदंड सर कॉर्नर ते पुढील सर्व गल्यामध्ये पाणी पुरवठयाची लाईन टाकण्यात आलेली नाही व त्यामूळे नळ जोडणी होवू शकलेली नाही या सर्व नागरीकानी दोन तीन वर्षापुर्वी रु.५००/-मध्ये नळ जोडणी देण्याच्या महानगरपालिकेच्या योजनेमध्ये ही फि भरलेली आहे असे असतांना आज पर्यत त्यांना नळ जोडणी देण्यात आलेली नाही.
२. त्यामूळे महानगरपालिकेने त्वरीत पाणी पुरवठयाची लाईन टाकून सर्व नागरीकांना तात्काळ नळ जोडणी द्यावी या भागातील सर्व नागरीक महानगपालिकेचा टॅक्स रेग्युलर भरणारे आहेत.
३. प्रभातनगर-नागसेननगर शाळेच्या दोन्ही बाजूकडील गल्या तसेच शाळेच्या समोरील काही भाग व शाळेच्या पाठीमागील गल्ली.या ठिकाणी अनेक वर्षापासून पाणी पुरवठा बिलकुलही होत नाही. इथे आवश्यक कार्यवाही करावी
४. श्री सलीम यांचे घरापासून ते श्री इंद्रजीत सोनकांबळे यांच्या घरापासून मोठी पाईप लाईन टाकून वरील लाईनला जोडण्यात यावी

**सुचक** :- डॉ.सौ.शीला कदम **अनुमोदक :-** गफार खान गुलाम महमंद खान

**विषय क्र.१८:-** **प्रस्ताव**

श्री माधव संभाजी पाटील,रा.नांदेड यांचा मुलगा ऋतूराज पाटील हा जन्मत: १०० टक्के दोन्ही कानाने बहिरा व मुका आहे त्यांच्यावर Cochlear implant मुंबई येथे झाले आहे त्यांच्यावर डॉ.तुषार वनसागर श्रवण शास्त्रज्ञ व वाचा -भाषा विकात तज्ञ (मुंबई) येथे उपचार चालू आहे.सदर उपचारार्थ एकूण रक्कम रु.३,४६,०००/-लागत आहे परतु सदर माधव पाटील हे अत्यंत गरीब असून अत्यत हलाखीची परिस्थिती आहे. करीता ऋतूराज पाटील याच्या उपचारासाठी रु.३,४६,०००/-आर्थिक अनुदान देण्याकरीता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभॆत कायम करण्यात येतो.

**सुचक :-** सतिष राखेवार,मंगला गजानन देशमूख **अनुमोदक** :- फारुख अली खॉ ,अब्दुल फसीहा अ.मुख्तार,वैजयंती गायकवाड

**विषय क्र.१९:-** **प्रस्ताव**

प्रभाग क्र.४० मध्ये वाघाळा हे गांव आहे, नांदेड येथे महानगरपालिका अस्तित्वात आली तेंव्हा नांदेड नगरपालिका या नांवासोबत वाघाळा शहर महानगरपालिका असे नामानिधान करण्यात आले व त्यास राज्य शासनाची मान्यताही प्राप्त झाली. आज महापालिकेच्या मुख्य इमारतीवर नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका असे नांव आहे. नांदेड शहराचा देखणा व भरीव विकास होत असताना वाघाळा हे नांव असलेले मुळ गांव मात्र ग्रामीण भागातील खेडयांपेक्षाही बकाल अवस्थेत आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची इमारत व विकास पाहण्यासाठी महाराष्ट्रातून तज्ञ, अभ्यासु मंडळी दौऱ्यावर येत असतात. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या अनेक यशस्वी योजना शहरात राबवून प्रथम क्रमांकसुध्दा पकाविलेला आहे. परंतु भविष्यात अभ्यास दौऱ्यावर आलेल्या शिष्टमंडळातील एखाद्या जाणकाराने वाघाळा हे नांव असलेलेल ठिकाण दाखवा ? असा जर प्रश्न केला तर सुंदर शहर म्हणून ख्याती पावलेल्या शहराची वाघाळा हे गांव पाहून निराशा झाल्याशिवाय राहणार नाही. तेंव्हा या प्रस्तावाद्वारे सभागृहास विनंती करते की, नांदेड वाघाळा शहर महापालिका असलेल्या वाघाळा यागांवचा सर्वांगिण विकास करण्यासाठी जसे-रुंदीचे रस्ते, पथदिवे, स्ट्रिट लाईट, वाचनालय, मनपा शाळा, अंतर्गत फुटपाथ रस्ते, शहर बस वाहतूकीचे शेड बांधणे, अत्याधुनिक पध्दतीचे व्यायामशाळा बांधणे, सार्वजनिक लधुशंकेसाठी मुत्रालय, पोलीस चौकी, सखोल भागात पुल बांधून

कठडे बांधणे इत्यादी बाबींचा विकास करण्यासाठी महापालिकेस वाघाळा हे नामाविधान असलेल्या गांवाच्या विकासात व सौंदर्यांत भर टाकण्यासाठी ही सर्वसाधारण सभेने २ कोटी रूपयाची मान्यता देवून आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणे बाबत.

**सुचक** :- डॉ.करुणा जमदाडे. **अनुमोदक** :- सौ.रजिया बेगम आयुबखान

**विषय क्र.२०:-** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. ४० हडको बसस्टॅाप जवळ मोठया प्रमाणात व्यापारी दुकाने असून बस स्टॅाप मूळे या भागात नेहमी नागरीकांची गर्दी असते व रविवारचा बाजारही भरतो व आजूबाजूला पुर्ण नागरी वसाहत आहे. नागरीकांना युरिनलची कोणत्याही प्रकारची व्यवस्था नाही करीता महानगरपालिकेचे साई मंगल कार्यालयाच्या परिसरात नागरीकाकरीता युरिनलचे बांधकाम करण्यासाठी लागणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**सुचक :-** डॉ.करुणा भिमराव जमदाडे **अनुमोदक :-** रजिया बेगम

**विषय क्र.२१:-** **प्रस्ताव**

वसरणी गट क्र.२४ मधील टी.व्ही. सेंटरच्या पाठीमागील खदाणीची जागा ही महाराष्ट्र शासनाची असून सदर जागा ही मनपाने हस्तांतर केली तर त्या ठिकाणी सार्वजनिक कामासाठी जसे-दवाखना, शाळा(ई-लर्निंग स्कुल), व्यायामशाळा, गार्डन, शॉपिंग सेंटर, इत्यादी उपक्रम राबविता येते. कारण वसरणी या भागामध्ये अनु.जाती, अनु.जमाती, अल्पसंख्यांक, मागासवगीय सर्व क्षेत्रातील लोक राहतात. तेथील नागरिक सोयी सुविधा पासून वंचित आहेत. या अनुषंगाने सदर जागा मनपाने हस्तांतर केले तर तेथील लोकांच्या सोयी सुविधेमध्ये भर पडेल. यास्तव महाराष्ट्र शासनाची ही जागा मनपाला हस्तांतर करण्यासाठी शिफारस करण्यात येते.

**सुचक :-** श्री. संजय मोरे **अनुमोदक :-** श्री. सतिश राखेवार

**विषय क्र.२२:-** **प्रस्ताव**

प्रभाग क्र.१० लेबर कॉलनी येथे मोउकळीस आलेल्या आणि ३०x४५ च्या घरासमोरील खुल्या जागेत घरकुल योजने अंतर्गत नागरिकांना घरे बांधुन देण्यासाठीच्या कामाला याच सर्वसाधारण सभेमध्ये मंजूरी देऊन अंतिम स्वरूप द्यावे व बी.एस.यु.पी योजने अंतर्गत घरे लवकरात लवकर बांधावी कारण यासाठी लागणारी म्हाडाची परवानगी (NOC) महानगरपालिकेला यापूर्वीच मिळाली आहे. (संदर्भः कार्यकारी अभियंता, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, लातुर विभाग यांचे पत्र जा.क्र.२८०/दि.१०.१०.२०१३) तसेच या घरकुल योजनेसाठी महानगरपालिकेने मला पाठवलेल्या ना हरकत पत्राची प्रत (संदभः नगर रचना विभाग/नरवी-१५४दि.०४.०४.२०१३) लेबर कॉलनी येथे बी.एस.यु.पी. अंतर्गत घरे बांधण्यात यावी याकरीता मी मा. राज्यमंत्री, सचिनजी अहिर साहेब यांना दि.२८.१२.२०१२ रोजी एका निवेदनाद्वारे विनंती करुन त्यांची संमतीचे पत्र वजा सुचना त्यांनी म्हाडा, औरंगाबादला केलेल्या आहेत. लेबर कॉलनी, भागात बी.एस.यु.पी अंतर्गत घरे बांधुन द्यावी म्हणून नागरिकांची एक यादी महापालिकेकडे पडून आहे. यासर्व बाबींची पूर्तता करून सुध्दा विलंब लागत असल्यामुळेच सर्व बाबी सर्वसाधारण सभेमध्ये ठेवून सर्वानुमते मंजुर करण्यात येते.

**सुचक :-** स.जानी म.कासीम **अनुमोदक :-** इतरत फातेमा पि.स. मजहर हुसेन,

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**महापौर,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.